Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

**दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com**

क्र/कोविमं/माध्य.गोप/उ.मा.गोप./ ९८८०
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक :- ०५ /०९/२०२४

**प्रति,**

**मुख्याध्यापक/प्राचार्य,**
**मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,**
**सातारा व सांगली जिल्हा.**

**विषय - माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षांसाठी परीक्षक/नियामक यांचे पॅनेल अद्यावत करणेबाबत.**

वरील विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यक्षेतील सर्व व्यवस्थापनाच्या अनुदानीत /अंशत: अनुदानीत/कायम विनाअनुदानीत व स्वयंअर्थसहाय्यीत शाळा/ क.महाविद्यायलामधील कार्यरत असणाऱ्या शिक्षकांची माहिती संकलित करण्यासाठी तालुकानिहाय कॅम्प घेण्याचे नियोजन विभागीय मंडळाने केले आहे.

आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, सदर कॅम्पच्या दिवशी आपण स्वत: व आपल्या शाळेचे लिपिक यांनी नियोजित ठिकाणी येताना शाळेची सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षाची शिक्षणाधिकारी(माध्य.) यांनी मान्य केलेली माध्यमिक विभागाची संच मान्यता व शिक्षण उपसंचालक यांनी मान्य केलेली उच्च माध्यमिक विभागाची संच मान्यता प्रत सादर करावयाची आहे. कॅम्पच्या ठिकाणी खालील नमुन्यामध्ये माहिती सादर करावी.

| अ. क्र. | शिक्षकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | नियुक्ती दिनांक | सेवा निवृत्ती दिनांक | इ.१० वी, इ.१२ वी शिकवत असलेले विषय | विषय शिकवत असलेला अनुभव | पेपर तपासणी साठीचा विषय | पेपर तपासणी चे माध्यम | भ्रमण-ध्वनी क्रमांक | वेतन घेत असलेले बँक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | खाते क्रमांक | IFSC code |
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

आपल्या शाळेमध्ये सेमी इंग्रजीचे वर्ग चालू असल्यास गणित व विज्ञान विषयांसाठी अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या नावासमोर सेमी इंगजीचा उल्लेख करावा. **तसेच छोटया शाळांमध्ये एकाच शिक्षकाकडे एका पेक्षा अधिक विषयाचे शिक्षक अध्यापन करत असतील तर कोणत्या विषयाचे पेपर तपासणीसाठी दयावे याचा विचार करुन माहिती भरावी.**

उच्च माध्यमिक विभागाची यादी सादर करताना वरील प्रपत्राचाच वापर करुन इ.१२ वी ला अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची माहिती स्वतंत्ररित्या सादर करण्यात यावी. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कार्यरत(पूर्णवेळ, अर्धवेळ, CHB तत्वावर) तथापि विभागाची मान्यता नसलेल्या सर्व शिक्षकांची माहिती सुध्दा वरील प्रपत्रात नमूद करावी.

सदरची माहिती सादर करताना सन २०२१-२२ व २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाच्या मंजूर पदाच्या आधारे माहिती सादर करावयाची आहे. संच मान्यतेसोबत सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षाचे शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे साप्ताहिक वेळापत्रक सादर करावयाचे आहे. तसेच **माहे जुलै २०२४ चे** वेतन पथकाने मंजूर केलेल्या वेतन देयकाची छायाप्रत सादर करावयाची आहे.

उच्च माध्यमिकची माहिती सादर करताना शाखानिहाय, (कला/वाणिज्य/विज्ञान/MCVC) वेळापत्रक सादर करण्यात यावे. वरीलप्रमाणे कॅम्पमध्ये माहिती सादर करण्यासाठी आपण सोबत दिलेल्या वेळापत्रकानुसार व नमूद केलेल्या ठिकाणी **सकाळी ११.०० ते ३.००** या वेळेत संबंधित स्विकृती केंद्रावर उपस्थित रहावयाचे आहे. आपल्या शाळेची/कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती अप्राप्त झाल्यास अथवा आपण गैरहजर राहिल्यास आपणाविरुध्द प्रशासकीय कारवाई प्रस्तावित केली जाईल याची नोंद घ्यावी.

ज्या शाळेत कनिष्ठ महाविद्यालय वर्ग आहेत त्यांनी एकाच दिवशी माहिती सादर करावी.

**(सुभाष रा. चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

सोबत - पॅनल माहिती जमा करण्याचे ठिकाण, दिनांक मागील पृष्ठावर नमूद आहे.

माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी शिक्षक पॅनल
जिल्हानिहाय जमा करावयाचे दिनांक व ठिकाण

जिल्हा सांगली

| अ.क्र. | तालूका | वार, दिनांक व वेळ | संकलन ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | आटपाडी<br>खानापूर<br>कडेगांव | गुरुवार दिनांक १९/०९/२०२४<br>वेळ ११.०० ते ३.०० | सौ.शोभादेवी पवार इंग्लिश मेडियम स्कूल, खानापूर |
| २ | जत<br>कवठेमहांकाळ | गुरुवार दिनांक १९/०९/२०२४<br>वेळ ११.०० ते ३.०० | श्री रामराव विद्यामंदीर हायस्कूल, जत |
| ३ | मिरज<br>सांगली | गुरुवार दिनांक १९/०९/२०२४<br>वेळ ११.०० ते ३.०० | हि.हा. राजा चिंतामणराव पटवर्धन हायस्कूल, गणेशदुर्ग, सांगली |
| ४ | पलूस<br>तासगांव | शुक्रवार दिनांक २०/०९/२०२४<br>वेळ ११.०० ते ३.०० | स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर, तासगांव |
| ५ | शिराळा<br>वाळवा | शुक्रवार दिनांक २०/०९/२०२४<br>वेळ ११.०० ते ३.०० | हजरत मोहम्मद सुलेमान उर्दू हायस्कूल, इस्लामपूर |

जिल्हा सातारा

| अ.क्र. | तालूका | वार, दिनांक व वेळ | संकलन ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कराड<br>पाटण | सोमवार दिनांक २३/०९/२०२४<br>वेळ ११.०० ते ३.०० | हुसेन कासम दानेकरी ॲंग्लो उर्दू हायस्कूल, कराड |
| २ | जावळी<br>खटाव<br>कोरेगांव | सोमवार दिनांक २३/०९/२०२४<br>वेळ ११.०० ते ३.०० | न्यू इंग्लिश स्कूल, सोमवार पेठ,सातारा |
| ३ | सातारा | सोमवार दिनांक २३/०९/२०२४<br>वेळ ११.०० ते ३.०० | निर्मला कॉन्व्हेंट हायस्कूल,<br>सदर बझार, सातारा |
| ४ | खंडाळा<br>माण<br>फलटण | मंगळवार दिनांक २४/०९/२०२४<br>वेळ ११.०० ते ३.०० | यशवंतराव चव्हाण हायस्कूल, फलटण |
| ५ | महाबळेश्वर<br>वाई | मंगळवार दिनांक २४/०९/२०२४<br>वेळ ११.०० ते ३.०० | महात्मा गांधी विद्यालय व ज्युनियर कॉलेज, पाचवड, ता. वाई |